Annexure - B

## Integrity Pledge for Citizens

I believe that corruption has been one of the major obstacles to economic, political and social progress of our country. I believe that all stakeholders such as Government, citizens and private sector need to work together to eradicate corruption.

I realise that every citizen should be vigilant and commit to highest standards of honesty and integrity at all times and support the fight against corruption.

I, therefore, pledge:

- To follow probity and rule of law in all walks of life;
- To neither take nor offer bribe;
- To perform all tasks in an honest and transparent manner;
- To act in public interest;
- To lead by example exhibiting integrity in personal behaviour;
- To report any incident of corruption to the appropriate agency.

# सत्यनिष्ठा प्रतिज्ञा

आपल्या देशाची आर्थिक, राजनितीक आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा मोठा अडथळा आहे असा माझा विश्वास आहे. या भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सर्व भागधारक जसे की सरकार, नागरिक आणि खाजगी क्षेत्र यांनी एकत्रित येऊन काम करण्याची आवश्यकता आहे यावर माझा विश्वास आहे.

प्रत्येक नागरिकाने सावध राहायला पाहिजे आणि सदासर्वदा प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा यांच्या उच्चतम मानकांबावत वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुध्दच्या लढ्यात साथ द्यायला पाहिजे.

अंतत: मी शपथ घेतो की,

- जीवनाच्या सर्व क्षेत्रात सत्यता आणि कायद्याच्या नियमांचे पालन करेन.
- लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही.
- सर्व कार्ये प्रामाणिक आणि पारदर्शीपणे करेन.
- जनहितामध्ये कार्य करेन.
- व्यक्तिगत वागणूकीत प्रामाणिकपणा दाखवून उदाहरण प्रस्तुत करेन.
- भ्रष्टाचाराची कोणत्याही घटनेची माहिती योग्य एजन्सीला देईन.

भगत सिंह कोश्यारी
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



राज भवन
मलबार हॉल
मुंबई ४०० ०३५
दूरध्वनी : ०२२-२३६३ २६६०
फॅक्स : ०२२-२३६८ ०५०५

१४ ऑक्टोबर २०२०

# संदेश

दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२० या कलावधीत आपण राज्यात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करीत आहोत.

सुराज्य व सुशासन प्रक्रियेत भ्रष्टाचार एक मोठा अडथळा आहे. भ्रष्टाचारामुळे एकीकडे देशाच्या प्रगतीचा वेग तर खुंटतो, तर दुसरीकडे सामान्य गरजू नागरिक शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभांपासून वंचित राहतो. यास्तव सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी संस्थांनी आपापले व्यवहार अधिकाधिक पारदर्शी ठेवावेत तसेच कर्मचारी व अधिकाऱ्यांनी समाजाप्रती, राज्याप्रती तसेच देशाप्रती आपल्या उत्तरदायित्वाची जाणीव ठेवावी. यंदाच्या दक्षता जनजागृती सप्ताहाचा भर 'सतर्क भारत, समृद्ध भारत' निर्मितीवर आहे. हा सप्ताह केवळ एक उपचार न राहता प्रत्येकाने या समृद्ध भारत निर्मितीसाठी वैयक्तिक तसेच संस्थात्मक योगदान दिले पाहिजे.

दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने आपण सर्व जण भ्रष्टाचार मुक्त नव महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी कटिबद्ध होऊ या.

(भगत सिंह कोश्यारी)

**राज्यपाल, महाराष्ट्र**

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते



मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

## शुभेच्छा

केंद्रीय दक्षता आयोगाच्या धर्तीवर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाकडून २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२० या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, ही निश्चित समाधानाची गोष्ट आहे. नागरिक आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्या दरम्यान विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असा आहे.

लोकहिताच्या योजनांच्या अंमलबजावणीत भ्रष्टाचारामुळे अडसर निर्माण होतो. विकास कामांची गती मंदावते. त्यामुळे अशा जनजागृतीच्या उपक्रमांतून नागरिक आणि प्रशासकीय यंत्रणांतील घटकांमध्येही जागरूकता आणणे आवश्यक ठरते. त्यासाठी भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ आणि जनजागृतीसाठी राबविण्यात येणारे हे उपक्रम सर्वदूर आणि शेवटच्या घटकांपर्यंत पोहचावेत, अशी अपेक्षाही मी या निमित्ताने व्यक्त करतो.

यातून जनता आणि प्रशासना दरम्यानचा विश्वास वाढीस लागून महाराष्ट्राच्या विकासाचा महामार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वासही मला वाटतो. या दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासाठी सामान्य प्रशासन विभागाचे अभिनंदन. तसेच यातील विविध उपक्रमांकरिता आणि सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी मनापासून शुभेच्छा!

आपला नम्र

उद्धव बाळासाहेब ठाकरे